Lyceum India Journal of Social Sciences || ISSN (Online): 3048-6513
Volume: 3 Issue: 3 || February 2026 (Special Issue 1) || DOI: 10.5281/zenodo.18849108

# भारतातील ग्रामीण सामाजिक संस्थेतील परिवर्तन

**डॉ. गोविंद बावस्कर**[1]

**प्रास्ताविक :**

कोणताही समाज स्थिर नाही. समाजात नित्य परिवर्तन घडत असते. ग्रामीण समाजही याला अपवाद नाही. ब्रिटिश राजवट, वाहतुकीची व दळणवळणाची साधने, पाश्चिमात्य शिक्षण प्रभाव, शिक्षणाचे वाढते प्रमाण, नागरीकरण व औद्योगिकीकरण यासारख्या प्रक्रियांमध्ये ग्रामीण समाजाचे पारंपरिक रूप हे पूर्ण पालटले आहे. एकेकाळचे प्रजासत्ताक खेडे आता बदलत चालले आहे. ग्रामीण लोकांचे विश्वास, विचार, जीवनविषयक दृष्टिकोन दिनचर्या, आहार, पोशाखपद्धती, राहणीमान, जीवनशैली यात फरक पडला आहे. येत्या ५० वर्षात ग्रामीण समाजातील परिवर्तनाने वेग धरला आहे. केवळ नागरीकरणच वाढले असे नव्हे तर 'नगरवादाची' प्रक्रिया सुरू झाली. ग्रामीण समाजात शहरी संस्कृती, जीवनपद्धतीचे प्रसरण त्याचा प्रभाव पडणे म्हणजे नगरवाद होय. तेव्हा नगरवादामुळेही पारंपरिक खेड्यांचे चित्र पालटले आहे. आधुनिक तंत्रज्ञान व विज्ञान यामुळेही ग्रामीण समाज स्वरूप बदलले आहे.

**उद्दिष्टे** :-

१ ग्रामीण सामाजिक संस्थेतील परिवर्तनाचा आढावा घेणे

**संशोधन पद्धती :-** प्रस्तुत संशोधन लेखासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अवलंब केला असून दुय्यम तथ्य सामुग्रीचा आधार घेण्यात आला आहे.

**संस्थात्मक बदल** :- कोणत्याही समाजाच्या संस्कृतीचे प्रतिबिंब त्या त्या समाजाच्या सामाजिक संस्थामध्ये पडलेले असते. म्हणूनच ग्रामीण समाजाचे बदलते स्वरूप अभ्यासल्यानंतर पारंपरिक ग्रामीण समाजातील प्रमुख सामाजिक संस्थांमध्ये कोणकोणते बदल झाले याचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

**१. अर्थसंस्थेतील बदल -** ग्रामीण समाजसंस्थेतील बदलास प्रामुख्याने आर्थिक क्षेत्रातील बदलाचा फार मोठा प्रभाव पडला आहे. निसर्गावर पूर्णतः अवलंबून पारंपरिक पद्धतीने शेती करणारा आजचा शेतकरी यांत्रिक पद्धतीचा वापर करीत आहे. ट्रॅक्टरने शेती नांगरणे, मळणीयंत्र, फवारणी यंत्र, पाण्यासाठी विजेची मोटार, पंप, ठिबक सिंचन पद्धत यासारख्या तंत्राचा वापर वाढला आहे. याशिवाय सुधारित बी-बियाणे, रासायनिक खते, औषधे यांचा वापर वाढला. कोरडवाहू शेती ऐवजी ओलित शेतीचे प्रमाण वाढले. कॅनॉलचे पाणी यामुळे शेती उत्पादनात वाढ झाली. वाहतुकीची, दळणवळणाची साधने यामुळे स्वायत्त एकाकी खेडी संपुष्टात आली. उत्पादन वाढल्याने राहणीमान, घरातील वस्तू यावर शहरी संस्कृतीचा प्रभाव पडला. बलुता पद्धती जाऊन स्वतःचा छोटा मोठा व्यवसाय ग्रामीण लोक करीत आहेत. पंचवार्षिक योजनांद्वारे खेड्यांचा

[1] सहयोगी प्राध्यापक,बलभीम महाविद्यालय बीड

जो विकास झाला त्यामुळे येथील आर्थिक जीवनमान उंचावले. बदलले. सहकारी तत्त्वावरील साखर कारखाने, बँका, कर्जवाटप यामुळे तर यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडून आले आहेत.

**२. जाती संस्थेतील बदल-** भारतीय ग्रामीण समाजातील जाती हा त्यांचा प्रमुख मूलाधार होता. त्याच जाती संस्थेला नागरीकरण, औद्योगिकीकरण, पाश्चिमात्य शिक्षण प्रसार, वाहतुकीची साधने, वगैरे कारणांमुळे जबरदस्त हादरा बसला. जातिप्रथेवर आधारित समाजरचना आज लयास जात आहे. जन्मावर आधारित अर्पित दर्जा जाऊन अर्जित दर्जास प्राधान्य दिले जात आहे. पारंपरिक आर्थिक स्वयंपूर्णता व बलुतेदारी यामुळे जाती जातींचे परस्परावलंबन कमी झाले. जातीजातीतील सलोखा कमी होत आहे. परंपरागत जाती पंचायतीचे महत्त्व कमी होत चालले आहे. जातीनुसार व्यवसाय हे तत्त्व ग्रामीण समाजातून हळूहळू नष्ट होत आहे. शिक्षणाच्या प्रसारामुळे विभिन्न जातीचे लोक वेगवेगळा व्यवसाय करीत आहेत. खाणेपिणे व सामाजिक संबंधातही आज काटेकोरपणा राहिला नाही. अस्पृश्यता निर्मूलन कायदा, अनेक सामाजिक चळवळी यामुळे अस्पृश्यांमध्ये 'जाणीव जागृती' झाली आहे. विवाहाच्या बाबतीत मात्र जाती आंतर्विवाह नियम आजही पाळला जातो.

**३. कुटुंबसंस्थेतील बदल -** पारंपरिक ग्रामीण समाजात संयुक्त कुटुंबपद्धतीस महत्त्वपूर्ण स्थान होते. आज मात्र ग्रामीण भागातील संयुक्त कुटुंबाचे चित्र बदलले आहे. विभक्त राहण्याचे प्रमाण येथेही वाढत आहे. स्थलांतरित झालेली नवी पिढी आपल्या मूळ कुटुंबापासून दुरावत चालली आहे. कुटुंबातील कर्त्याची हुकूमशाही कमी झाली आहे. कुटुंबातील शिस्त व समतोल ढासळत चालला आहे. व्यक्तीच्या गरजा वाढल्या त्यामुळे शेतीवरील अवलंबनाबरोबरच इतरही व्यवसाय व्यक्ती करू लागल्या आहेत. कुटुंबाद्वारे पारंपरिक व्यावसायिक शिक्षणाचे महत्त्व कमी झाल्याने कुटुंबाचे महत्त्वही कमी झाले. सामाजिक, आर्थिक, राजकीय संरक्षण देण्याच्या दृष्टीनेही ग्रामीण कुटुंबास असलेले महत्त्व दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. कुटुंबातील सामूहिक वृत्ती जाऊन व्यक्तिवादी दृष्टी वाढत आहे. कुटुंबातील वृद्धांचा अधिकार, परस्परांबद्दलची आत्मीयता, जिव्हाळा, कर्तव्यपरायणता कुटुंबाभिमान कमी होत चालला आहे. एकंदरीत आज ग्रामीण क्षेत्रातील कुटुंबाच्या रचनेत व कार्यात आमूलाग्र बदल झालेला आढळून येतो.

**४. विवाहसंस्थेतील बदल-** पारंपरिक ग्रामीण समाजातील विवाह संस्थेचे स्वरूप व सद्यः स्थितीतील ग्रामीण समाजातील विवाहसंस्थेचे स्वरूप यात बदल झाला आहे. विवाहाचे वाढते वय यामुळे ग्रामीण भागातील बालविवाहाचे प्रमाण कमी कमी होत चालले आहे. वधू-वर निवडीचे स्वातंत्र्य आज थोड्या प्रमाणात वधू-वरांना मिळत आहे. ग्रामीण भागातील मुलीही शिक्षण घेत असल्यामुळे त्यांच्यात 'स्व' जाणीव निर्माण झाली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील बऱ्याच कुटुंबात विवाह ठरविताना मुलीच्या मतास प्राधान्य दिले जाते. आंतरजातीय विवाह होत नसले तरी आंतरजातीय विवाह करणाऱ्यास जाती बहिष्कृत करण्याची पद्धत मागे पडत आहे. विवाह साजरा करण्याच्या पद्धतीतही शहरी पद्धतीचा प्रभाव पडलेला दिसून येतो. हुंडा, मानपान, प्रथा, परंपरा जपणे हे जरी चालू असले तरी नागरी समाजाच्या प्रभावाने येथील विवाह संस्थेत परिवर्तन घडत आहे.

**५. धर्मसंस्थेतील बदल -** निसर्ग सान्निध्य निसर्गावरील अवलंबन व शेती हा प्रमुख व्यवसाय यामुळे ग्रामीण समाजजीवनावर आजही धर्माचा प्रभाव पडलेला दिसतो. तरीही औद्योगिकीकरण, नागरीकरण, शिक्षणाचा वाढता प्रसार यामुळे ग्रामीण

समाजातील धर्मसंस्थेत परिवर्तन घडत आहे. अंधविश्वास, रूढीप्रियता, कर्मकांडाचे अधिक्य या बाबींवर आधुनिक विचारांचा प्रभाव पडत आहे. त्यामुळे कर्मकांडाचे महत्त्व कमी झाले आहे. पण त्याचबरोबरच ग्रामीण लोकांवर धर्माचा पगडा कमी झाल्याने सामाजिक नियंत्रणात धर्माचे महत्त्व कमी होत आहे. ग्रामीणांची नीतिमत्ताही ढासळत आहे. जत्रा, उत्सव, उरूस येथील गर्दी मात्र वाढत चालली आहे. एकंदरीत ग्रामीण समाजातील धर्माचे पारंपरिक स्वरूप आज पालटत आहे.

**६. शैक्षणिक बदल -** ग्रामीण समाजातील अर्थ, कुटुंब, विवाह, धर्म, जाती संस्थेप्रमाणेच येथील शिक्षण संस्थेतदेखील बदल घडत आहेत. अनौपचारिक पद्धतीने व्यवसायाचे शिक्षण कुटुंबामार्फत मिळण्याचे प्रस्थ कमी झाले. औपचारिक शिक्षणाचे महत्त्व वाढले. शिक्षणामुळे आपला आर्थिक, सामाजिक, वैयक्तिक विकास होतो हे आज ग्रामीण लोकांना पटत आहे. त्यामुळे गाव तेथे शाळा उघडत आहेत. त्याबरोबरच महाविद्यालयेही निघत आहेत. कृषी महाविद्यालयांची संख्या वाढत आहे. अशिक्षितपणा हे आपल्या सर्व समस्यांची जननी आहे. हे त्यांना पटते आहे. त्यामुळे आज ग्रामीण भागात प्रौढ शिक्षणाचाही प्रसार होत आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक शिक्षणाचीही सोय उपलब्ध केली जात आहे. मुलींच्या शिक्षणाचेही प्रमाण वाढत आहे. साक्षरतेचे प्रमाण म्हणावे तितके वाढले नसले तरी शिक्षणाविषयीची ग्रामीण लोकांची वाढती आस्था हाही लक्षणीय बदल मानावा लागेल. शिक्षणाच्या वाढत्या प्रसारामुळे दैववाद, अंधश्रद्धा कमी होत आहेत. त्यामुळे ग्रामीण लोक आजारी पडल्यास औषधोपचार करीत आहेत. दवाखाना, डॉक्टर यांचे महत्त्व वाढत चालले आहे. एकंदरीत ग्रामीण समाजातील शैक्षणिक बदल समाजातील पारंपरिकता कमी करण्यास उपयुक्त ठरतो.

**७. राजकीय नेतृत्वातील बदल-** भारतीय ग्रामीण राजकीय जीवनात आज अनेक परिवर्तने घडून येत आहे. जातीपंचायतीचे महत्त्व कमी झाले. लोकशाहीच्या विकेंद्रीकरणामुळे ग्रामपंचायतीचे महत्त्व वाढले. निवडणुका, पक्ष, सत्ता वगैरे गोष्टींचे ज्ञान ग्रामीणांना आले. निवडणुकीचा हक्क, मतदानाचा हक्क याविषयी हे लोक जागरूक झाले. पारंपरिक पोलीस पाटील, कुलकर्णी यांचे महत्त्व कमी झाले. जात-पात, स्त्री-पुरुष याचा विचार न करता नवनेतृत्वाची समान संधी सर्वांना मिळत आहे. राजकीय घडामोडींच्या बाबतीत ग्रामस्थ बरेच जागरूक झालेले आढळतात. एकंदरीत निवडणुकीच्या प्रक्रियेने संपूर्ण ग्रामीण जीवन ढवळून निघाले आहे. ग्रामीण जीवनात नवीन भावनात्मक, मानसिक व भौतिक गतिशीलता आकारास येत आहे. त्याचबरोबर सामुदायिक भावना लयास जात आहे. एकंदरीत ग्रामीण समाजातील संस्थात्मक बदलामुळे पारंपरिक ग्रामीण समाजाचे स्वरूप बरेच बदलले आहे.

**८. तांत्रिक बदल -** तांत्रिक घटकामुळे पारंपरिक ग्रामीण जीवनातील संपूर्ण समाजजीवनात कायापालट घडवून आणला आहे. शेतीच्या क्षेत्रातील तांत्रिक साधनामुळे आजचा शेतकरी प्रगतशील शेतकरी बनला आहे. शेतीच्या क्षेत्रात नवीन तांत्रिक साधनांचा वापर, ट्रॅक्टर, मळणीयंत्र, कापणीयंत्र सुधारित बी-बियाणे, रासायनिक खते, औषधे, ठिबक सिंचन, विजेची मोटार यामुळे शेतीत सुधारणा झाल्या. उत्पादनात वाढ झाली. बागायती शेतीचे महत्त्व वाढले. फळबागा वाढल्या आहेत. बँकामार्फत मिळणाऱ्या कर्जामुळेही शेतकरी सुधारत आहे. गोबर गॅस, पशुपालक, मासेमारी यासाठी शासनाकडून मिळणाऱ्या सवलती त्यातून तांत्रिक घटकांचा वाढता वापर यामुळे ग्रामीण समाजाचे चित्र पालटत आहे. पारंपरिक व्यवसाय, हस्तव्यवसाय मागे पडून नव्या व्यवसायांनी शिरकाव केला आहे. वाहतुकीच्या साधनांमुळे नागरी संस्कृतीशी

परिचय झाला. शेतीमालाची ने-आण वाढली. परिणाम आर्थिक विकासाला चालना मिळाली. यांत्रिक परिवर्तनामुळे सामाजिक मूल्ये व आचारविचारातही खूप मोठा बदल घडून आला.

**९. सांस्कृतिक बदल-** तांत्रिक घटक, शिक्षणाचे वाढते प्रमाण, औद्योगिकीकरण, नागरीकरण आदी कारणांमुळे ग्रामीण समाजाच्या साध्यासुध्या, एकजिनसी संस्कृतीत आमूलाग्र बदल घडत आहेत. वेशभूषा, केशभूषा, आहार, खाणे-पिणे, करमणुकीची साधने, संगीतशिल्प, घराचे बांधकाम, घराची सजावट यात बदल झाला आहे. घरातही अनेक सुविधा केल्या जात आहेत. गोबर गॅस, गॅस विजेची उपकरणे, टेबल खुर्ची, स्टेनलेस स्टीलची भांडी, शिवणयंत्रे, टीव्ही, रेडिओ, ट्रान्झीस्टर यांचा शिरकाव ग्रामीण जीवनात झाला आहे. ग्रामीण लोकांच्या प्रकृती व विचारातही परिवर्तन घडत आहे. सहकार्य व सामूहिक भावनेला तडे जात आहेत. व्यक्तिगत स्वार्थ, ग्रामीण भागातही साधला जात आहे. परस्पर कर्तव्य व त्यागभावना लोप पावत आहेत. त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोनही बदलत चालला आहे. एकंदरीत त्यांची संस्कृती बदलून नागरी संस्कृतीचा प्रभाव अधिक पडला आहे.

**१०. आरोग्यविषयक बदल-** ग्रामीण समाजजीवनावर नागरी संस्कृतीचा शिक्षणाचा प्रभाव पडला. त्याबरोबरच त्यांचा जीवनविषयक दृष्टिकोन, जीवनशैली बदलली. वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या प्रभावामुळे ग्रामीण अंधश्रद्धा कमी होऊन दवाखाना, औषधोपचार, शस्त्रक्रिया, इंजेक्शन यांचे महत्त्व ग्रामीण लोकांना पटत आहे. मांत्रिक, गंडे-दोरे, बळी देणे यासारख्या कुप्रथा आजारपण घालविण्यासाठी चालत असत त्यांचे पूर्ण उच्चाटन झाले नसले तरी त्यांचा वापर बराच कमी झाला आहे. ग्रामीण लोक आरोग्याच्या बाबतीत जागरूक झाला आहे. असाध्य रोग दूर करण्यासाठी शहरातील वैद्यकीय सुखसोयींचा उपयोग करून घेत आहे. स्त्री आरोग्याबाबत कुटुंबनियोजनाबाबतही ग्रामीण जनता जागरूक झाली आहे. व्यवसायाधीनता कमी करण्याचा प्रयत्नही हे लोक करीत आहेत. एकंदरीत आरोग्यविषयक सुखसोयींचा, वैद्यकीय सोयींचा लाभ घेऊन आपले आरोग्यमान चांगले ठेवण्याचा प्रयत्न ग्रामीण भागातील लोक करीत आहेत.

**११. करमणुकीच्या साधनातील बदल-** ग्रामीण समजाचे मनोरंजनाचे क्षेत्रही पालटले आहे. ट्रान्झीस्टर, रेडिओ, दूरदर्शन, व्ही.सी.डी. संगणक, टुरिंग टॉकीज, व्हिडिओ यासारख्या नव्या साधनांमुळे मनोरंजनाच्या बाबतीत देखील ग्रामीण क्षेत्र परिवर्तित होत आहे. भजन, कीर्तन, लोकगीते, लोककथा, गीते, धार्मिक उत्सव ही पारंपरिक मनोरंजनाची साधने आज संपुष्टात येत आहेत. त्यांची जागा सिनेसंगीत, सिनेमा, नाटक, व्हिडिओगेम, दूरदर्शन वरील कार्यक्रम संगणक यांनी घेतली आहे. लोकगीते, पोवाडे, प्रवचने, कथाचे सामुदायिक वाचन यांचा प्रभाव ग्रामीण जीवनातून कमी होत चालला आहे. गळयात ट्रान्झीस्टर, हातात मोबाईल त्यावरील गाणी ऐकत फिरणारा शेतकरी आता मोठ्या प्रमाणात आढळतो. एकंदरीत नागरी संस्कृतीच्या प्रभावाने ग्रामीण करमणुकीत कुटुंबाचे महत्त्वही कमी झाले. एकूण करमणुकीकडे पाहण्याचा ग्रामस्थांचा दृष्टिकोनही बदलला.

**सारांश :-**

अशाप्रकारे ग्रामीण समाजाचे चित्र पालटत आहे. दिवसेंदिवस खेडी व शहरे यातील अंतर कमी होत आहे. तरीही भारतीय खेडी आजही आपली खास वैशिष्ट्ये टिकवून आहेत. आजही संयुक्त कुटुंबपद्धती, शेती हाच मुख्य व्यवसाय, साधे जीवनमान व सामुदायिक भावना यांचे महत्त्व संपूर्णतया नष्ट झालेले नाही. भारतीय खेडी ही संक्रमणावस्थेत आहेत इतकेच.

**संदर्भ सूची :-**


- 'भारतीय सामाजिक संरचना' डॉ. विजय देशपांडे प्रा. मोरेश्वर बर्दापूरकर विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा औरंगाबाद.
- 'भारतीय समाज आणि सामाजिक समस्या' रा. ज. लोटे, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.
- 'भारतीय समाजव्यवस्था' प्रा. रा. ना. घाटोळे श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.
- 'भारतीय समाज संरचना आणि समस्या' डॉ. प्रदीप आगलावे साईनाथ प्रकाशन, नागपूर.
- 'भारतीय समाजरचना' प्रा. डॉ. प्रकाश बोबडे श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.
- 'भारतीय समाज संरचना व परिवर्तन' डॉ. ज्योती डोईफोडे विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.


**Publisher's Note:** *The views and opinions expressed in this article are solely those of the author(s) and do not necessarily reflect those of the publisher, editors, or the editorial board.*